महाराष्ट्र शासन

# उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

**ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन**

उमेद

## जिल्हा व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षात विविध पदे अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी / कर्मचा-यांमधून Internal Job Promotion (IJP) पध्दतीने भरण्यासाठी जाहिरात

**एमएसआरएलएम/एचआर/प्र.क.१०६/दिनांक १३/०१ /२०१५**

ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामीण विकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थ सहाय्याने 'राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना'ची सुरुवात केलेली आहे. या अभियानाच्या माध्यमातून 'गरीबांचे आर्थिक व सामाजिक समावेशन करणे तसेच गरीबांनी, गरीबांसाठी व गरीबांच्या स्वयंचलित आणि शाश्वत संस्था उभ्या करणे' हे या अभियानाचा मुख्य उद्देश आहेत.

या उद्देशपूर्तीसाठी महाराष्ट्र शासनाने ग्रामविकास विभागांतर्गत संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये 'महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना'ची स्थापना केलेली आहे. अभियानाच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील खालील पदे अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचा-यांमधून Internal Job Promotion (IJP) पध्दतीने **११ महिन्याच्या करार तत्वावर कंत्राटी पध्दतीने भरण्यात येणार आहेत.**

**जिल्हा व तालुका कक्षातील विविध पदे**

| अ.क्र. | पदाचे नाव | जिल्हे | एकूण पद संख्या | आरक्षित पदे | अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा व्यवस्थापक - क्षमता बांधणी | ठाणे, रत्नागिरी, नंदुरबार, जालना, वर्धा, गोंदिया व गडचिरोली | ०७ | Open -०३ (१म), NT-B१, OBC-२ (१म), ST-१ | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत तालुकास्तरावर तालुका अभियान व्यवस्थापक किंवा तालुका व्यवस्थापक म्हणून किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| २ | जिल्हा व्यवस्थापक - सामाजिक समावेशन व संस्थीय बांधणी | रत्नागिरी, उस्मानाबाद व वर्धा | ०३ | Open -०२(१म), OBC-१(१म) | |
| ३ | जिल्हा व्यवस्थापक - उपजीविका | वर्धा | ०१ | Open -०१ | |
| ४ | जिल्हा व्यवथापक - MIS | ठाणे, सोलापूर, व रत्नागिरी | ०३ | Open -०३ (१म) | |
| ५ | तालुका व्यवस्थापक - क्षमता बांधणी | ठाणे, रत्नागिरी, सोलापूर, उस्मानाबाद, जालना, नंदुरबार, यवतमाळ, वर्धा, गोंदिया व गडचिरोली | ०५ | Open -०३ (१म), SC-१, OBC-१ | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत क्लस्टर कोऑर्डिनेटर म्हणून किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| ६ | तालुका व्यवस्थापक - सामाजिक समावेशन व संस्थीय बांधणी | | ०४ | Open -०४ (१म), | |
| ७ | तालुका व्यवस्थापक - उपजीविका | | ०९ | Open -०४ (१म), SC-१, OBC-३ (१म), ST-१ | |

*(टिप : म- महिला, *उपलब्ध झाल्यास महिलांसाठी आरक्षित पदे)*

अभियानांतर्गत कार्यरत आणि वरील प्रमाणे अर्हता धारण करणा-या इच्छूक अधिकारी/कर्मचा-यांनी वरील पदांसाठी **दिनांक २१ जानेवारी २०१५, रात्री ११.५९ वा.** पर्यत **www.jobs.msrlm.org** किंवा **www.umed.in** या संकेतस्थळावर किंवा **कर्मचा-यांच्या ईमेलवर पाठविलेल्या लिंकवर ऑनलाईन (Online) अर्ज सादर करणे आवश्यक आहे.** उशीर प्राप्त होणा-या व अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही. पदसंख्येत बदल, रिक्त पदांच्या ठिकाणांमध्ये बदल, पात्रतेच्या निकषांमध्ये बदल/दुरुस्ती करण्याचे तसेच कोणतीही पुर्वसूचना न देता प्रकिया रद्द करण्याचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे राखीव ठेवण्यात आले आहेत. निवड प्रकियेचे स्वरुप व वेळपत्रक वरील संकेतस्थळांवर उपलब्ध करुन देण्यात येईल.

स्वा/-<br>
मुख्य कार्यकारी अधिकारी<br>
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान